# जाहीर नोटीस

**उपजिल्हाधिकारी भूसंपादन जिल्हा मुख्यालय**
**सिंधुदुर्गनगरी ओरोस ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग यांचे कार्यालय**
**खाजगी क्षेत्रातील जमीन सिंचन व इतर प्रकल्पांसाठी खाजगी**
**वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने घेणेबाबत,**

**शासन निर्णय क्रमांक - संकिर्ण - ०३/२०१५/प्र.क्र. ३४/अ - २ दिनांक १२ मे २०१५**
**शासन निर्णय क्रमांक - संकिर्ण - ०३/२०१५/प्र.क्र. ३४/अ - २ दिनांक ३० सप्टेंबर २०१५**
**शासन परिपत्रक क्रमांक एलक्युएन - ०१/२०१७/प्र.क्र. १२/अ - २ दिनांक २५ जानेवारी २०१७**

भूसंपादन प्रस्ताव क्रमांक २९/२०१८ वेंगसर - ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागाकडील शासननिर्णय क्र. संकीर्ण - ०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२ मे २०१५ , शासननिर्णय क्रमांक - संकिर्ण - ०३/२०१५/प्र.क्र. ३४/अ - २ दिनांक ३० सप्टेंबर २०१५ , शासन परिपत्रक क्रमांक एलक्युएन - ०१/२०१७/प्र.क्र. १२/अ - २ दिनांक २५ जानेवारी २०१७ अन्वये खाजगी क्षेत्रातील जमीन सिंचन व इतर प्रकल्पासाठी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, याखाली नमूद केलेल्या अनुसुची - (एक) मध्ये वर्णन केलेली जमीन सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे. अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते.

त्याअर्थी, या जाहीर नोटीसद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, उपरोक्त शासननिर्णयांनुसार खालील अनुसुची - (एक) मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे संबंधी कोणत्याही व्यक्तीने, ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उपरोक्त शासननिर्णयानुसार कार्यवाही पूर्ण होईपर्यंतचे कालावधीमध्ये याखाली अनुसुची - (एक) मध्ये वर्णन केलेल्या जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही तबदिलीचा व्यवहार अगर सदर मिळकत इतर कोणत्याही प्रकारे विल्हेवाट करू नये किंवा सदर जमिनीवर कोणत्याही शासकीय अगर निमशासकिय संस्थेचा अगर ति-हाईत इसमाचा भार निर्माण करू नये.

त्याचप्रमाणे असे जाहिर करण्यात येते की, याखाली नमुद केलेल्या अनुसूची - (एक) मधील मिळकतीवर कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून पंधरा दिवसांचे आत उपजिल्हाधिकारी भूसंपादन जिल्हा मुख्यालय या कार्यालयात संबंधित इसमांनी प्राधिकृत अधिका-यास कागदोपत्री पुराव्यानिशी प्रत्यक्ष भेटून खात्री पटवून दयावी.

त्याअर्थी, यादवारे असे जाहिर करण्यात येते की, जर कोणत्याही व्यक्तीने वर नमुद केलेल्या तरतदींचे हेतू पुरस्कर उल्लंघन केल्यास तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकारी अथवा प्राधिकृत अधिका-यांकडून कोणतीही भरपाई दिली जाणार नाही. अगर या कालावधीनंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

तसेच उपरोक्त शासन निर्णयानुसार भूमी अभिलेखाच्या अदययावत करणाचे काम हाती घेणार असल्याचे व ते पूर्ण करणार असल्याचे घोषित कर यात येत आहे.

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग यांजकडील परिपत्रक क्र एल.क्यू.एन.-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२ दिनांक २५/०१/२०१७ मधील १ (ब) नुसार जि धिकारी यांनी उपरोक्त विषयास अनुसरून कार्य पार पाडण्यासाठी उपजिल्हाधि ारी, भूसंपादन जिल्हा मुख्यालय सिंधुदुर्ग यांना पदनिर्देशित केले आहे.

**अनुसूची - एक**

**जमिनीचे वर्णन**

**गांव - वें सर तालुका - वैभववाडी जिल्हा - सिंधुदुर्ग**

| अ क. | सर्व्हे क्रमांक हिस्सा क्रमांक | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| | ५१/८ पै | ०.०३.६० |
| | ५९/१ पै | ०.१०.०० |
| | ५९/३ पै | ०.३१.०० |
| | ५९/४ पै | ०.२०.०० |
| | ६८/० पै | ०.०१.२० |
| | ७९/४ पै | ०.१४.२० |
| | ७९/८ पै | ०.१४.८० |
| | ७९/१० पै | ०.०७.२० |
| | ७९/११ पै | ०.०३.७० |
| १ | ७९/१२ पै | ०.०२.०० |
| १ | ७९/१३ पै | ०.०२.४० |
| १ | ७९/१६ पै | ०.१९.०० |
| १ | ७९/२२ पै | ०.०५.४० |
| **एकूण** | | **१.३४.५०** |

**अनुसूची- दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे ना** - अरूणा मध्यम पाटबंधारे प्रकल्प

**थेट खरेदीचे प्रयोजन** - अरूणा मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या मौजे वेंगसर तालुका वैभववाडी येथी पुनर्वसन गावठाण पोहोच रस्त्यासाठी

**समाजाला मि णारे लाभ** - सोयीसूविधा , पायाभूत सूविधा

**ठिकाण - सि दुर्गनगरी**

**दिनांक -**

**( रोहिणी रजपूत )**
**उपजिल्हाधिकारी, भूसंपादन,**
**जिल्हा मुख्यालय सिंधुदुर्ग**